# मुकुल माधव फाउंडेशनने विशेष मुलांना दिली राइझिंग पुणे सुपरजायंटच्या खेळाडूंना भेटण्याची संधी

**पुणे :** गल्फ लुब्रिकंट्स इंडिया लिमिटेड (जीओएलआयएल) ने, फिनोलेक्स इंडस्ट्री लिमिटेडचा हा सीएसआर प्रकल्प असलेल्या मुकुल माधव फाउंडेशनबरोबर भागीदारी केली आहे, याअंतर्गत ऋअपंग कल्याणकारी शिक्षण संस्थे'च्या विशेष मुलांसाठी, पुणेस्थित आयपीएल फ्रांचाइजीच्या राइजिंग पुणे सुपरजायंटच्या खेळाडूंबरोबर संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्टीव्हन स्मिथ, फाफ दु प्लेसिस आणि जयदेव उनाडकत हे टीमचे स्टार खेळाडू यासाठी उपस्थित होते. तसेच ते एनजीओच्या ३० मुलांबरोबरच्या धमाल कार्यक्रमात सहभागीही झाले होते.

आरपीएसच्या अधिकृत वाहतूक बस ऋगल्फ फॅन बस'मधून आरपीएसच्या टीमला भेटण्यासाठी मुलांना संस्थेतून कार्यक्रमाच्या ठिकाणी आणण्यात आले. येथे मुलांनी खूप धमाल खेळ खेळले आणि क्रिकेटपटूंबरोबर प्रत्यक्ष खेळण्याची संधीही त्यांना उपलब्ध झाली. मुलांमधील स्वप्ने फुलावीत यासाठी हा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, यासाठी धकाधकीच्या वेळापत्रकातून खेळाडूंनी वेळ काढला होता. आपल्या आवडत्या खेळाडूंना भेटण्यासाठी मुले अतिशय उत्सुक होती. यानिमित्ताने, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या संचालक आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती रितु छाबरिया म्हणाल्या की, ऋऋआमच्ये संपूर्ण प्रकल्पात, खेळांनीच मुले




सबळ होऊ शकतात हे आम्ही पाहात आलोय, त्यांच्यात कमालीचे परिवर्तन यामुळे घडते. आम्ही दीर्घकाळापासून अपंग कल्याणकारी शिक्षण संस्थेबरोबर संलग्नित आहोत आणि आमच्या प्रकल्पासाठी आमच्या मुलांना भेटायला आंतरराष्ट्रीय ख्यातीचे क्रिकेटपटू आल्याने आम्हाला अतिशय आनंद झालेला आहे, आम्हाला मुलांना विश्वास द्यायचाय की, काहीही अशक्य नाहीये. पुण्यातील ट्राफिक पोलिसांसाठी यशस्वी हेल्मेट ड्राइव्ह केल्यावर आम्ही गल्फ ऑईलबरोबर हा दुसरा प्रकल्प केला आहे आणि मी त्यासाठी त्यांचे आभार मानते; त्यांच्याशिवाय हा कार्यक्रम शक्य झाला नसता.''